सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- १) भारतीय साथ रोग अधिनियम १८९७
२) क्रिमीनल प्रासिजर कोड १९७३
३) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१
४) भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८
५) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५,
६) कोरोना विषाणू संसर्ग प्रतिबंध करीता या कार्यालयाकडून निर्गमित करणेत आलेले आदेश

---

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.जि.आ.व्य/कावि/३९९ /२०२०.
पुणे, दिनांक :- १०/०४/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात भारतीय साथ रोग अधिनियम १८९७ हा दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करणेत आलेला आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

त्या अर्थी कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्याचे अनुंषंगाने अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापपन प्राधिकरण यांनी विविध आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच क्रिमीनल प्रासिजर कोड १९७३ चे कलम १४४, मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३७ (१) (३) नुसार विविध आदेश पारीत करणेत आलेले आहेत.

ज्या अर्थी, भारतीय साथ रोग अधिनियम १८९७ मधील कलम ३ अन्वये – Penalty - Any person disobeying any regulation or order made undet this Act shall be deemed to have committed an offence punishable under section १८८ of the Indian Penal Code (४५ of १८६०) अशी तरतुद नमुद केली आहे.

ज्या अर्थी,, क्रिमीनल प्रासिजर कोड १९७३ मुंबई पोलीस अधिनिमय १९५१ तसेच कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेले आदेशांचा भंग काही व्यक्ती करीत असलेचे माझे निदर्शनास आलेले आहे.

त्या अर्थी **मी नवल किशोर राम, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे** या आदेशान्वये क्रिमीनल प्रासिजर कोड १९७३ चे कलम १४४ व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ तसेच कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्याचे अनुषंगाने निर्गमित केलेले आदेश, **ज्या दिनांकास असे आदेश पारीत केलेले आहेत.** अशा आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० ले कलम १८८ नुसार पारीत केलेल्या **आदेशाचे दिनांकापासून गुन्हे दाखल करणेकामी पुणे जिल्हयातील ग्रामीन क्षेत्रातील संबंधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना याव्दारे प्राधिकृत करीत आहे.**

सदर आदेश हा पुणे जिल्याहतील **ग्रामीन क्षेत्रातील** संबधित पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास तात्काळ आणणेत यावा.

सदरचा आदेश माझे मुळ सहि शिक्क्यानिशी दिनांक १०/०४/२०२० रोजी दिला.

जिल्हाधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,पुणे

प्रति,
1) मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर
2) पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
3) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व
4) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सर्व

Scanned by CamScanner